




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here



वर्ष : ०६ | अंक : ५०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०३ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु, चिंता वाढवणारी आकडेवारी !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** राज्यासह देशातून आता मान्सून परतण्याची शक्यता आहे. मान्सूनचा परतीचा प्रवास आता सुरु झाला असल्याची माहिती हवामान विभागाकडून अधिकृतपणे देण्यात आली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तर भारतातील उर्वरित भाग, संपूर्ण गुजरात आणि मध्य प्रदेशातून नैऋत्य मान्सूनने माघार घेतली आहे. तसेच बिहार, झारखंड, छत्तीसगड आणि महाराष्ट्राच्या काही भागांतूनही मान्सून परतला आहे. महाराष्ट्रात पुढील २ ते ३ दिवसांत मराठवाडा, विदर्भ, मध्य महाराष्ट्राचे आणखी काही भागांतून मान्सून माघारी जाण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कोकण आणि गोवा भागात ३ ते ५ ऑक्टोबरदरम्यान उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. तसेच कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये ६ ते ९ ऑक्टोबरदरम्यान काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा




पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर मराठवाडा आणि विदर्भात पुढील २ ते ३ दिवसांत अनेक भागांतून मान्सून माघारी जाण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे.

**उर्वरित देशात काय परिस्थिती राहणार?**

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, छत्तीसगडमध्ये ६ आणि ७ ऑक्टोबर रोजी वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल येथे ४ ते ६ ऑक्टोबरदरम्यान ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहू शकतात. तर काही ठिकाणी वाऱ्याचा वेग हा ताशी ६० किमीपर्यंत पोहोचू शकतो. केरळ, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि इतर काही भागांतही वादळी वारे किंवा विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

**महाराष्ट्रात पावसाची मोठी तूट**

यंदा अपेक्षित पाऊस न पडल्याने राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट बघायला मिळत आहे. हवामान विभागाकडून विभागनिहाय आणि जिल्हानिहाय किती टक्के पावसाची तूट आहे? याबाबतची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कोकण-गोवा विभागात दरवर्षी सरासरी २८७०.८ मिमी पाऊस पडतो. पण यंदा २४८०.१ मिमी इतका पाऊस पडला आहे. त्यामुळे कोकण-गोवा विभागात १४ टक्के पावसाची तूट आहे. मध्य महाराष्ट्रात सरासरीच्या ७४७.४ मिमी पाऊस अपेक्षित असतो. पण यंदा या विभागात केवळ ६६२.१ मिमी पाऊस पडला आहे. त्यामुळे ११ टक्के पावसाची तूट आहे.

मराठवाडा विभागात तब्बल ४० टक्के पावसाची तूट आहे. इथे दरवर्षी ६४२.८ मिमी सरासरी पावसाची अपेक्षा असते. पण यंदा इथे केवळ ३८८.७ मिमी पाऊस पडला आहे. तर विदर्भात सरासरीच्या ९३७.३ मिमी पाऊस अपेक्षित असतो. यंदा इथे केवळ ७१७.६ मिमी पाऊस पडला आहे. त्यामुळे विदर्भात तब्बल २३ टक्के पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित महाराष्ट्रात यंदा १९ टक्के पावसाची तूट आहे.

# महायुतीतला मोठा तिढा सुटला !

## विधान परिषदेच्या पुणे शिक्षक मतदारसंघाची जागा भाजपच्या वाट्याला गेल्याची शक्यता...

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.०३, पुणे :** महायुतीमधील विधान परिषदेच्या पुणे शिक्षक मतदारसंघाच्या जागेचा तिढा अखेर सुटला आहे. गेल्या काही दिवसांपासून सत्ताधारी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंद यांच्या शिवसेनेकडून सातत्याने पुणे शिक्षक मतदारसंघाच्या जागेवर दावा केला जात होता. त्यामुळे या जागेवरुन महातुतीत पेच निर्माण झाल्याचं बघायला मिळत होतं. विशेष म्हणजे पुणे शिक्षक मतदारसंघासाठी एकनाथ शिंदेंचे निकटवर्तीय मंगेश चिवटे यांच्या नावाची देखील चर्चा होती.

दुसरीकडे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे शिक्षक आणि पदवीधर या दोन्ही जागा परंपरेनुसार भाजपकडे आहेत, असा दावा केला होता. तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातही पुणे शिक्षक मतदारसंघाच्या जागेसाठी बैठकांचा धडाका सुरु होता. पण या सर्व घडामोडींनंतर आता तीनही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेअंती ही जागा भाजपसाठी सुटल्याची माहिती आहे. भाजपकडून मंत्री चंद्रकांत पाटील यांचे निकटवर्तीय कौस्तुभ गावडे यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे.

**कौस्तुभ गावडे काय म्हणाले?**

दरम्यान, कौस्तुभ गावडे यांनी 'एबीपी माझा'ला प्रतिक्रिया दिली आहे. गेले तीन वर्षे शिक्षकांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावरची लढाई चांगल्या पद्धतीने लढण्याचं काम केलं आहे. मी सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करतो. एक युवा म्हणून माझ्यावर त्यांनी जो विश्वास व्यक्त केला आहे, तो येत्या काळात मी सार्थ करुन दाखवेन एवढीच ग्वाही महायुतीच्या सर्व नेत्यांना देतो, असं कौस्तुभ गावडे म्हणाले.

**शिक्षकांना निवडणुकीत काय आश्वासने देणार?**

माझा जाहीरनामाच असा आहे की, जुनी पेन्शनसाठी लढाई, टीईटीसक्ती विरुद्धची लढाई असेल, जाचक संचमान्यच्या अटी आहेत, यामुळे मोठ्या प्रमाणावर शिक्षक अतिरिक्त होत आहेत. त्याविरुद्ध लढाई असूदेत. त्याचबरोबर शिक्षकांना सातत्याने शैक्षणिक कामकाज लागते. येत्या काळात शुन्य शैक्षणिक कामकाज मिळावे, जेणेकरुन विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचं काम आम्ही येत्या काळात करणार आहोत, अशी माहिती कौस्तुभ गावडे यांनी दिली.

**भाजप तीन जागा लढण्याची शक्यता**

आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, महायुतीत भाजप पुणे पदवीधर, पुणे शिक्षक आणि नागपूर पदवीधर अशा तीन जागा लढणार आहे. तर अमरावती शिक्षक जागा शिवसेना, आणि छत्रपती संभाजीनगरची जागा राष्ट्रवादी काँग्रेस लढणार असल्याची माहिती मिळत आहे.

**२३ ऑक्टोबरला होणार मतदान**

दरम्यान, विधान परिषदेच्या ३ पदवीधर आणि २ शिक्षक जागांच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघ, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) विभाग पदवीधर मतदारसंघ आणि पुणे विभाग शिक्षक तसेच अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ अशा एकूण पाच जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे. या सर्व जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ६ ऑक्टोबर आहे. येत्या २३ ऑक्टोबरला या जागांसाठी मतदान होणार आहे. तर २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.

# लष्करातील जवान आणि शेतकरी निवडणूक लढविणार...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** भारतीय लष्करातील जवान आणि शेतकरी हे देशाचे महत्त्वाचे घटक आहेत. मात्र,सरकारकडून त्याच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्याच्या प्रश्नांना राजकीय अजेंड्यावर स्थान दिले जात नाही. त्यामुळे महाराष्ट्र, राजस्थान आणि इतर राज्यांमधील आगामी निवडणूक स्वबळावर लढविणार असल्याची घोषणा 'भारतीय जवान किसान पार्टी' ने शनिवारी मुंबईत केली. सीमेवर कठीण परिस्थितीत देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या भविष्यासाठी ठोस धोरणा आवश्यक असल्याने आम्ही २०२९च्या निवडणुकांमध्ये पक्ष संघटनात्मक ताकदीने लढणार असल्याचे पक्षाने स्पष्ट केले.

भारतीय जवान किसान पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी शनिवारी मुंबई प्रेस क्लब येथे माध्यमांशी संवाद



साधला. यावेळी महाराष्ट्रातील ज्येष्ठ शेतकरी नेते रघुनाथ पाटील, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुदर्शी मोहन राव तसेच पक्षाचे संस्थापक, राष्ट्रीय पदाधिकारी आणि विविध राज्यांतील पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुदर्शी मोहन राव यांनी सांगितले की, सैनिकांच्या सेवा कालावधीनंतर रोजगार, आरक्षण आणि पुनर्वसनाच्या प्रश्नांकडेही सरकारने अजिबात लक्ष देत नाही. सत्तेसाठी पक्षांमध्ये सतत बदल होत आहेत. राजकीय चर्चेत जातीय व धार्मिक मुद्द्यांना अधिक महत्त्व दिले जात आहे. मात्र, शेतकरी आणि जवानांचे मूलभूत प्रश्न कायम आहेत. भारतीय जवान किसान पार्टीच्या माध्यमातून शेतकरी आणि जवानांना एकत्र आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगत पाटील यांनी पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराची यावेळी माहिती दिली.

तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुदर्शी मोहन राव यांनी सांगितले की, भारतीय जवान किसान पार्टीची स्थापना २०२१ मध्ये करण्यात आली आहे. सध्या २२ राज्यांमध्ये त्याचे कार्यकर्ते कार्यरत आहेत. अनेक राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा राजकीय फायदा घेतला, मात्र आम्ही जवान आणि किसान या दोन्ही घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करीत आहोत, असे राव यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय सचिव दिलीप शार्दुल उपस्थित होते.

# २४ तासांत दुचाकी चोरीचा छडा; आरोपीस अटक, चोरीची स्कूटी जप्त

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०३, तलासरी (पालघर) :** तलासरी परिसरातून चोरीस गेलेल्या दुचाकीचा अवघ्या २४ तासांत छडा लावत तलासरी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. आरोपीकडून चोरीस गेलेली स्कूटीही जप्त करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मुकेश धाकू नडगे (वय २३, व्यवसाय शेती, रा. विसरदा, मुर्डेलपाडा, पोस्ट मांडोणी, दादरा नगर हवेली) यांनी ३ ऑक्टोबर २०२६ रोजी तक्रार दाखल केली. त्यांची हिरव्या-पांढऱ्या रंगाची स्कूटी (क्रमांक DD-01 F-4144) तलासरी येथील स्टेट बँकेसमोर पार्क करून ठेवली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती.याप्रकरणी तलासरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३३८/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच तलासरी पोलिसांनी स्वतंत्र पथक तयार करून तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान चोरीच्या गुन्ह्यात अजय मनोहर मायावंशी (वय ३६, रा.




राहुनार-नारगोल, मायावंशी फळिया, ता. उमरगाव, जि. वलसाड, गुजरात) याचा सहभाग निष्पन्न झाला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेत चौकशी केली असता चोरीची स्कूटी त्याच्याकडून जप्त करण्यात आली. आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता ३ ऑक्टोबर २०२६ रोजी एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून, पुढील तपास पोना/१२९ सचिन आहाड, नेमणूक तलासरी पोलीस ठाणे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय पोलीस अधिकारी निशा जाधव (डहाणू विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी अजय गोरड यांच्या नेतृत्वाखाली पोउनि./विकास दरगुडे, सहा. फौजदार/हिरामण खोटरे, पोहवा/९४० अनिल सोनवणे व तलासरी पोलीस ठाण्याच्या पथकाने केली.

# चिचोली व वलनी सर्कलच्या मूलभूत मागण्यासाठी आमरण उपोषण

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०३, नागपूर :** चिचोली व वलनी सर्कल अनेक विकास कामे मंजूर आहेत शिवाय अनधिकृत देशी दारू दुकान व समस्या तळ ठोकून आहेत. मात्र, राजकारण आडवे येत असल्यामूळे प्रत्येक्षात विकासकामांना सुरुवात करण्यात आली नाही त्यामुळे अखेर माजी उपसभापती राहुल तिवारी यांनी गांधीगिरी करत आक्रमक पवित्रा घेत आंदोलनाच हत्यार उपसल आहे.

गांधी जयंती निमित्त २ ऑक्टोबर पासून मागण्या पूर्ण होईपर्यंत अन्नामोड खापरखेडा येथे आमरण उपोषण सुरू केले आहे

गौण खनिज निधीतून वलनी सर्कल अंतर्गत मिलन चौक ते रोहना कोट्यवधी रुपयांचा सिमेंट रस्ता मंजूर करण्यात आला होता. मात्र, राजकारण आडवे आले, शिवाय दहेगाव ते अन्नामोड राष्ट्रीय महामार्गावर पथदिवे लावण्याची मागणी मागील अनेक महिन्यापासून थंड बसत्यात पडली आहे. शिवाय वेकोलि व खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात अनेक मूलभूत सुविधांचा अभाव आहे.

माजी मंत्री सुनील केदार यांनी २ ऑक्टोबर रोजी आंदोलन स्थळी भेट दिली. यावेळी एका आठवड्यात राहुल तिवारी यांच्या मागण्या मान्य न झाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा ईशारा शासनाला दिला. यावेळी अनेक राजकीय व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.




आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सलील देशमुख यांनी आंदोलन स्थळी भेट दिली. त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग व महसूल विभागाच्या अधिकाऱ्या सोबत चर्चा करून देशी दारूच्या दुकानाच्या प्रश्न निकाली काढा असे निर्देश दिले शिवाय संबंधित विभागा सोबत चर्चा केली.

आंदोलनाच्या दुसऱ्या दिवसा पर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी आंदोलन स्थळी भेट दिली नव्हती. अनेक राजकीय व सामाजिक संघटन राहुल तिवारी यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत आहे. खापरखेडा पत्रकार संघाने सुध्दा राहुल तिवारी यांच्या रास्त मागण्यांना पाठिंबा दर्शवत पाठिंबा जाहीर केला आहे.येणाऱ्या काळात आंदोलन चिघळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

अक्षराज






## अभिनेत्री संध्या



आपल्या अभिनय आणि नृत्य कौशल्याने मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीत वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या जेष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांची आज स्मृतिदिन. अभिनेत्री संध्या यांचे ४ ऑक्टोबर २०२५ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले होते. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली. अभिनेत्री संध्या म्हणजे अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ. २७ सप्टेंबर १९३२ रोजी जन्मलेल्या अभिनेत्री संध्या यांचे पूर्ण नाव विजया श्रीधर देशमुख असे होते. त्यांचे वडील रंगभूमीवरील कलाकार होते. त्यामुळे अभिनेत्री संध्या यादेखील रंगभूमीवर काम करू लागल्या. त्यांच्या मोठ्या भगिनी वत्सला या देखील रंगभूमीवर काम करत असत. अभिनेत्री संध्या यांना लहानपणापासूनच नृत्याची आवड होती त्यामुळे त्या नृत्याचे देखील कार्यक्रम करत असत. याच नृत्याने त्यांना चित्रपट सृष्टीत प्रवेश मिळवून दिला. दिग्दर्शक व्ही शांताराम यांनी अमर भूपाळी या चित्रपटासाठी अभिनेत्री संध्या यांची निवड केली कारण हा चित्रपट तमाशाप्रधान होता. यातील मुख्य नायिका ही तमासगिरीन होती. सहकाजीकच नायिकेला नृत्य कौशल्याची जाण असणे गरजेचे होते. अभिनेत्री संध्या यांच्याकडे नृत्य कौशल्याची चांगली जाण असल्याने त्यांची या चित्रपटासाठी निवड झाली. या चित्रपटातील तमासगिरणीच्या भूमिकेसाठी अभिनेत्री संध्या यांनी खूप कष्ट आणि नृत्याचे धडे गिरवले. त्यांच्या या कष्टाचे चीज झाले. हा चित्रपट खूप गाजला. यातील गाणीही खूप गाजली.

त्यानंतर त्यांना परछाई या हिंदी चित्रपटात खलनायिकेची भूमिका मिळाली या चित्रपटात त्यांनी संध्या हे नाव धारण केले पुढे हेच नाव रूढ झाले. झनक झनक पायल बाजे या संगीतप्रधान चित्रपटातही त्यांनी मुख्य नायिकेची भूमिका साकारली. या भूमिकेने त्यांना अनेक चित्रपट मिळवून दिले. तीन बत्ती चार रास्ता, दो आँखें बाराह हात, नवरंग यासारखे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील हिट झाले. नवरंग या चित्रपटातील जा रे जा नटखट.... या गाण्यात त्यांनी पुरुष आणि स्त्री अशा दोन्ही भूमिका निभावल्या. त्यानंतर त्यांनी स्त्री, सेहरा, लडकी सह्याद्री की, जल बन मछली नृत्य बिन मजली हे त्यांचे चित्रपट देखील गाजले. अभिनेत्री संध्या यांचा सर्वाधिक गाजलेला आणि लक्षात राहिलेला चित्रपट म्हणजे पिंजरा. या चित्रपटात त्यांनी साकारलेली नायिका अजूनही रसिकांच्या मनात घर करून आहे. अभिनय सम्राट निळू फुले, डॉ श्रीराम लागू यांच्यासारखे दिग्गज कलावंत असतानाही अभिनेत्री संध्या यांची भूमिका रसिकांच्या लक्षात राहिली. या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. या चित्रपटाने त्याकाळी विक्रम केला होता. चंदनाची चोळी अंग अंग जाळी हा त्यांचा शेवटचा चित्रपट. हा चित्रपटही गाजला. त्यानंतर मात्र त्यांनी मनोरंजन विश्वातून निवृत्ती स्वीकारली.

अभिनेत्री संध्या यांनी राजकमल चित्रपट संस्थेखेरीज इतर कोणत्याही चित्रपट संस्थेच्या चित्रपटात काम केले नाही. शेवटपर्यंत त्या राजकमल आणि व्ही शांताराम यांच्याशी एकनिष्ठ राहिल्या. त्यांनी व्ही शांताराम यांच्याशी विवाह केला. व्ही शांताराम यांच्या त्या तिसऱ्या पत्नी होत्या. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. महाराष्ट्र सरकारने त्यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्काराने गौरविले. अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ असलेल्या अभिनेत्री संध्या यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– अतुल पांडे**

# कितीं सुगंध सुस्वभावी माणसांचा

भल्या पहाटे किंवा सकाळच्या वेळी लता वेलींवर फुललेल्या सुगंधी फुलांचा सुगंध चोहीकडे सहजपणे दरवळतो आणि सर्वांचे मन प्रसन्न करून टाकतो .सुगंधी फुले सृष्टीने जगाला दिलेले सुंदर असे वरदान आहे.काही फुले आकाराने भव्यदिव्य असतात,दिसायला आकर्षक असतात,रंगीबेरंगी असतात पण त्यांना सुगंध नसतो.याउलट जी फुले दिसायला साधी व आकाराने लहान किंवा मध्यम असतात व रंगाने भडक नसतात त्या फुलांचा सुगंध मनमोहक असतो.त्या फुलांचा सुगंध कितीही घेतला तरी मन भरत नाही,मनाची तृप्ती होत नाही. आपण नेहमी पाहतो की सुगंधी फुले सगळ्यांना हवीहवीशी वाटतात,सुगंधी फुलांचा सहवास कधीच संपू नये असे वाटते त्याचप्रमाणे चांगल्या विचारांच्या माणसांचा,सुसंस्कृत व सुस्वभावी लोकांचा सहवास जीवनात शेवटपर्यंत टिकून राहावा असे वाटते.सुगंधी फुलाप्रमाणे या जगात चारित्र्यवान, कर्तृत्ववान,चांगल्या आणि सुस्वभावी लोकांचा किर्ती सुगंध दरवळत राहायला हवा.कारण अशी माणसं संपूर्ण मानवजातीचे हितचिंतक असतात, इतरांसाठी मार्गदर्शक असतात.

उत्तम चारित्र्य,मृदू भाषा,नेक वर्तन, कर्तव्यदक्ष,प्रामाणिक व्यवहार करणारे आणि सतत कार्यरत राहणारे चांगले व सुस्वभावाचे लोक पाहिले की या जगात आजही चांगल्या गोष्टी शिल्लक आहेत, आजही चांगले लोक आहेत आणि हे जग खरोखर सुंदर असल्याचे निदर्शनास येते.बालवयापासून ते प्रौढत्वाच्या वयापर्यंत किंवा अगदी वृध्द अवस्थेपर्यंत अनेक चांगल्या लोकांचा सहवास लाभला की जीवनाचा खराखुरा अर्थ कळतो.जीवन जगण्याचा आनंद प्राप्त होतो. अशी चांगली माणसे, चांगल्या स्वभावाची माणसे,प्रामाणिक माणसे,कर्तृत्ववान माणसे आणि स्वच्छ व निर्मळ मनाची माणसे त्यांच्या किर्ती सुगंधाने चारचौघांत नव्हे अनेक लोकांतही तेजस्वी ताऱ्यांप्रमाणे ठळक व सुस्पष्ट दिसतात. अशा चांगल्या व सुस्वभावी लोकांचा नामोल्लेख केल्याशिवाय राहवत नाही.ही माणसे खरोखर लक्षवेधक असतात परंतु प्रसिद्धीपासून कोसो दूर असतात.

मी व माझे कुटुंब सध्या लातूर येथील सर्वानंदनगर मधील सुस्वभावी व्यक्ती सन्माननीय छगनराव जाधव यांच्या बंगल्यात वास्तव्याला आहोत.छगनराव जाधव यांचा स्वभाव मनमिळाऊ व अतिशय चांगला स्वभाव आहे.ते सर्वांसोबत प्रेमळ व आपुलकीच्या भाषेत बोलतात.त्यांना मोठेपणाचा गर्व नाही की कशाचा अहंकार नाही.ते नेहमी कोणत्या ना कोणत्या कार्यात नेहमी मग्न असतात.ते त्यांची ड्युटी अतिशय प्रामाणिकपणे करतात.अशी कर्तृत्ववान माणसे जगात फार कमी होत आहेत.गावोगावी अनेक चांगले लोक असतात.त्या चांगल्या लोकांमुळे गावाचे गावपण टिकून राहिलेले असते. आमच्या गावातील चांगल्या व कर्तृत्ववान लोकांचा विषय निघाला तर आजही स्वातंत्र्यसैनिक कालिदासराव देशपांडे,निवृत्ती पाटील,प्रभाकर देशपांडे ,व्यंकटराव कोटगीरे,हबीब सय्यद,रविंद्र देशपांडे,बाबासाहेब जगताप,गंगाधर जगताप,सखाहरी अर्थमवार,राजेंद्र नरवाडे यांचा आवर्जून उल्लेख होतो.

आमच्या गावातील शांतिनिकेतन विद्यालयातील चांगल्या व आदर्श शिक्षकांनी आमच्या गावाच्या अनेक पिढ्या घडविण्याचे अद्वितीय कार्य केले आहे.त्या चांगल्या शिक्षकांची आजही हमखास आठवण येते.अप्पाराव लोहारे, अनंतराव बोरोळे,बंकटराव गरड, गणेशराव गुळवे,संभाजी परगे,श्यामराव शेकडे,रामराव सोमवंशी या आदर्श शिक्षकांनी नेहमीच आम्हाला आमच्या जीवनाचा आदर्श मार्ग दाखवला.माझे वडील दामोदर गुळवे,आई कौशल्याबाई गुळवे आणि थोरले बंधू नवनाथ गुळवे यांनी आम्हाला उच्च शिक्षण शिकण्यासाठी नेहमी प्रेरित केले. आमच्या जीवनाचा कायापालट केला. माझे बंधू प्रा.राजेंद्र गुळवे यांचे कर्तृत्व, वक्तृत्व आणि नेतृत्व आमच्यासाठी नेहमीच प्रेरणादायी आहे.बालाजी कांबळे आणि सुंदरबाई कांबळे हे दोघे मनाने निर्मळ,स्वभावाने एकदम स्वच्छ आणि साधे सरळ आहेत.यांना कधी भांडता येत नाही आणि रागावता पण येत नाही.यांना कोणी काही म्हटले,नावे ठेवली आणि बरेवाईट बोलले तर आतल्या आत झुरतात पण कधी कोणाला ब्र सुद्धा बोलणार नाहीत. आणि कोणाबद्दल मनात वाईट भावना ठेवणार नाहीत.सर्वांसोबत आपुलकीने व प्रेमळपणाणे वागतात.कधी कोणाचा तिरस्कार करणार नाहीत कधी चिडचिड करत नाहीत.

अशा चांगल्या लोकांच्या संगतीत राहणे व जीवन जगणे आनंददायी अनुभव असतो.चांगल्या व सुस्वभावी लोकांचा किर्ती सुगंध असाच दरवळत राहो.वाईट लोकांचा सुळसुळाट कमी करण्यासाठी अशा चांगल्या लोकांची जगाला नितांत गरज आहे.तुमच्या आसपास अशी चांगली माणसे असतील तर त्यांना जीवापाड जपा. चांगल्या व सुस्वभावी माणसांच्या संगतीत राहून आपणही तसेच चांगले बनायला हवे.

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२**

# प्लास्टिकचा शेवट कुठे? पुनर्चक्रणाच्या पुढे एक प्रश्न ?

आपण पाण्याची बाटली विकत घेतो, पाणी पितो आणि बाटली रिकामी होते. त्या क्षणी आपल्यासाठी तिचे काम संपते. पण बाटलीचे काम खरोखर तिथेच संपते का?

‘महा आर-पेट’सारखा उपक्रम सुरू होतो, तेव्हा या प्रश्नाकडे पुन्हा एकदा पाहण्याची संधी मिळते. PET बाटल्या वेगळ्या गोळा करणे, त्यांचे योग्य पद्धतीने पुनर्चक्रण करणे आणि त्यातून पुन्हा उपयोगी वस्तू तयार करणे ही नक्कीच आवश्यक प्रक्रिया आहे. विशेषतः बाटलीचा कचरा रस्त्यावर, नाल्यात किंवा जलस्रोतांमध्ये जाण्यापेक्षा तो व्यवस्थित गोळा होऊन पुनर्चक्रणाच्या प्रक्रियेत जाणे अधिक चांगले आहे.

पण इथेच माझ्या मनात एक साधा प्रश्न निर्माण होतो. एका बाटलीचे पुनर्चक्रण करून पुन्हा बाटली तयार झाली, तर त्या प्रवासाचा पुढचा टप्पा कोणता? आणि एखाद्या प्लास्टिकपासून बाटलीऐवजी कपडे, बेंच, इतर वस्तू किंवा दुसरे उत्पादन तयार केले, तर त्या वस्तूचे आयुष्य संपल्यानंतर काय होणार?

प्रत्येक पुनर्चक्रित वस्तू धोकादायक असते, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. योग्य तंत्रज्ञान, योग्य प्रक्रिया आणि योग्य नियंत्रण यामुळे पुनर्चक्रणातून अनेक उपयुक्त उत्पादने तयार होऊ शकतात. मात्र काही प्लास्टिक उत्पादनांच्या वापरादरम्यान घर्षण, धुलाई किंवा झीज यामुळे सूक्ष्म प्लास्टिकचे कण पर्यावरणात जाण्याबाबत जगभर संशोधन सुरू आहे. त्यामुळे मोठा प्लास्टिक कचरा आपण गोळा करतो, पण त्यातून निर्माण होणारा अदृश्य कचरा कुठे जातो, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा ठरतो.

म्हणूनच पुनर्चक्रण थांबवायचे आहे, असा माझा विचार अजिबात नाही. उलट, पुनर्चक्रण अधिक चांगले, अधिक सुरक्षित आणि अधिक परिणामकारक कसे करता येईल, याबरोबरच त्यापुढचे तंत्रज्ञान काय असू शकते, याचा शोध घ्यायला हवा, एवढीच अपेक्षा आहे. आपल्या हातातील मोबाइल फोनचे उदाहरण घ्या. काही दशकांपूर्वीचा मोबाइल आजच्या स्मार्टफोनच्या तुलनेत मोठा, मर्यादित सुविधा असलेला आणि वेगळ्या तंत्रज्ञानावर आधारित होता. त्या वेळी तोच शेवटचा टप्पा आहे, असे मानले असते तर आजचा स्मार्टफोन कदाचित अस्तित्वात आला नसता. संशोधनाने जुन्या मर्यादांकडे अडथळा म्हणून नव्हे, तर पुढच्या संधी म्हणून पाहिले.




प्लास्टिकच्या बाबतीतही अशीच विचार करण्याची वेळ आली आहे का?

आज PET बाटलीसाठी "Bottle-to-Bottle' हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. उद्या अशा प्लास्टिकसाठी, ज्याचे सुरक्षित आणि व्यवहार्य पुनर्चक्रण शक्य नाही, त्याचे रासायनिक कच्च्या मालात रूपांतर करता येईल का? काही विशिष्ट प्रकारच्या प्लास्टिकसाठी नियंत्रित पद्धतीने ऊर्जा किंवा इंधन मिळवता येईल का? किंवा आज आपल्याला माहीत नसलेला आणखी एखादा चांगला मार्ग उद्याच्या संशोधनातून सापडेल का?

"Plastic-to-Fuel' ही माझ्या दृष्टीने आज घोषित करण्यासारखी अंतिम उपाययोजना नाही. तो एक संशोधनाचा प्रश्न आहे. त्यामध्ये ऊर्जा किती लागेल, उत्सर्जन किती होईल, कोणते अवशेष निर्माण होतील, त्याचा आर्थिक परिणाम काय असेल आणि संपूर्ण जीवनचक्रात तो पर्यावरणासाठी खरोखर किती फायदेशीर ठरेल, हे वैज्ञानिक पद्धतीने तपासावे लागेल. उत्तर योग्य असेल तर पुढे जावे; योग्य नसेल तर त्यापेक्षा चांगला मार्ग शोधावा.

भारताच्या भविष्यातील ऊर्जाव्यवस्थेकडे पाहिले तरी हा प्रश्न पूर्णपणे दुर्लक्षित करता येणार नाही. सौर आणि पवनऊर्जेसारख्या पर्यायी ऊर्जेचा विस्तार होत असला, तरी पेट्रोलियमवर आधारित अनेक गरजा काही काळ आपल्या अर्थव्यवस्थेत राहणार आहेत. त्यामुळे वापरानंतर उरलेल्या काही प्लास्टिकपासून नियंत्रित पद्धतीने उपयोगी संसाधन किंवा ऊर्जा मिळवता येते का, हा विषय संशोधनाच्या पातळीवर तपासण्यासारखा आहे. मात्र यामध्ये एक गोष्ट स्पष्ट असायला हवीसर्व प्लास्टिकसाठी एकच उपाय असू शकत नाही. स्वच्छ आणि योग्य PET बाटली असेल तर तिचे उच्च दर्जाचे पुनर्चक्रण करणे योग्य ठरू शकते. दूषित किंवा पुनर्चक्रणास अयोग्य प्लास्टिकसाठी दुसरा मार्ग असू शकतो. आणि शेवटी कोणताही मार्ग निवडताना केवळ ‘कचरा दिसत नाही’ एवढे पुरेसे नाही; त्या प्रक्रियेनंतर पर्यावरणावर काय परिणाम होतो, हेही पाहावे लागेल. म्हणून ‘महा आर-पेट’ सारख्या उपक्रमाचा पुढचा टप्पा मला आणखी उत्सुक करणारा वाटतो. आज आपण लोकांना बाटली गोळा करायला शिकवतो. उद्या त्यांना त्या बाटलीचा संपूर्ण प्रवास दाखवता येईल का? वापरापासून संकलनापर्यंत, पुनर्चक्रणापासून नव्या उत्पादनापर्यंत आणि त्यानंतरच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत ‘यानंतर काय?’ हा प्रश्नही सार्वजनिक चर्चेचा भाग होऊ शकतो.

यासाठी शासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योग, संशोधक, तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या संस्था, शैक्षणिक क्षेत्र आणि नागरिक यांनी एकत्र विचार करणे आवश्यक आहे. कारण प्लास्टिकचा प्रश्न केवळ कचरा गोळा करण्याचा प्रश्न नाही. तो संसाधनांचा, तंत्रज्ञानाचा आणि भविष्यातील पिढ्यांचा प्रश्न आहे.

‘महा आर-पेट’च्या निमित्ताने हा उपक्रम पुढे नेणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करताना माझी एक नम्र विनंती आहेआज जे शक्य आहे ते नक्की करूया; पण उद्या काय शक्य होऊ शकते, याचा शोध घेणेही थांबवू नका. माझा प्रश्न पुनर्चक्रणाच्या विरोधात नाही. उलट, पुनर्चक्रणासोबत पुढच्या पिढीचे तंत्रज्ञान शोधण्याचा आहे. आजचा कचरा आपण एका नव्या उत्पादनात बदलला, एवढ्यावर समाधान मानायचे की त्या कचऱ्याचा प्रवास खरोखर कुठे संपतो, हेही शोधायचे?

कारण खरे शाश्वत समाधान म्हणजे कचरा एका रूपातून दुसऱ्या रूपात हलवणे नव्हे; तो पुन्हा समस्या बनू नये, याचा मार्ग शोधणे होय.

**- विजयकुमार कट्टी**

## लोकसेवा

लोकसेवाआयोगाची
कठीणतम ती परिक्षा
लाखो विद्यार्थ्यांमधून
पूर्ण अत्यल्प अपेक्षा

सातत्या कटू परिश्रम
जरुर भलती तितिक्षा
आपली क्षमता जाणा
अंतःकरणात समिक्षा

तपस्या सोपी न अशी
जाणा तथ्य घेतादिक्षा
तयारी करावी जय्यत
ओळखू आपली कक्षा

मार्ग विचारांती आखा
आधीचं ठरावा नक्शा
असो ट्यूटर चाणाक्य
जो देणारं उचीत दिशा

जिद्द हवीयं जिंकायला
पण नको घातक नशा
अनुत्तीर्ण झाले जरीही
ना बदलेल भाग्य रेषा

वाया ना जाई शिकले
उजळे नव्यानी आशा
यु पीएससी ना अंतिम
परिपूर्ण हो अभिलाषा

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# हनुमान चालीसाचे महत्व पुनःश्च अधोरेखित!

अत्यंत कमी खर्चात बनलेला आणि अल्पावधीत ब्लॉकबस्टर ठरलेला 'हनुमान अंश' चित्रपट अद्यापही अनेक स्क्रिनवर चालू आहे. अनेकांनी हा चित्रपट पुन्हा पुन्हा चित्रपटगृहात जाऊन पाहिला. या चित्रपटात 'हनुमान चालीसा' प्रतिदिन म्हणण्याचे आणि पठण करण्याचे लाभ विविध प्रसंगांतून विशद केले आहेत. प्रत्यक्षातही हनुमान चालीसा पठण करण्याचे फायदे अनेकांनी अनुभवले आहेत. अकारण वाटणारे भय हनुमान चालीसाचे पठण केल्याने दूर होते. जीवनात येणारे कठीण प्रसंग, परीक्षा, इंटरव्ह्यू, न्यायालयीन लढाया, व्यावसायिक चढ उतार यांसारख्या प्रसंगाना धैर्याने सामोरे जाण्यासाठी गरज असते ती आत्मविश्वासाची. हा आत्मविश्वास हनुमान चालीसाच्या पठणाने निर्माण होतो. आर्थिक विवंचनेने ग्रासलेल्या व्यक्तीला धैर्य देण्याचे काम हनुमान चालीसा करते. नियोजित कार्यात येणारे अडथळे हनुमान चालीसाच्या पठणाने दूर झाल्याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. मनाला ग्रासलेल्या नकारात्मकतेला दूर करण्याचे काम हनुमान चालीसा करते. हनुमान चालीसाच्या नियमित पठणाने मन सकारात्मक होऊन प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मकतेने पाहण्याची दृष्टी निर्माण होते. अनिष्ट शक्तींचा त्रास दूर होऊन हनुमान चालीसा नियमित म्हणणाऱ्याच्या भोवती संरक्षक कवच निर्माण होते असे हनुमान चालीसामध्ये सांगण्यात आले आहे. गंभीर आजारात धैर्य आणि बळ देण्याचे कार्य हनुमान चालीसा करते. अशा या हनुमान चालीसाचे महत्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. फ्लायदुबईच्या विमानात सहपायलटने जीवघेणा हल्ला केला असतानाही भारतीय कॅप्टन पायलट स्मित मच्छार यांनी कॉकपिटचे दार उघडले आणि विमानाचे सेफ लँडिंग केले. हे करत असताना त्यांचे हनुमान चालीसाचे पठण चालू होते. एकाही प्रवाशाचा जीव जायला नको हा एकच विचार त्यावेळी त्यांच्या मनात होता. त्यामुळे साक्षात हनुमंतानेच येऊन स्मित यांना साहाय्य केले आणि भक्ताचे मनोरथ पूर्ण केले असे म्हटले जात आहे. हनुमान अंश चित्रपटात दाखवण्यात आलेले घटित प्रसंग आणि वर्तमानात घडलेला हा बाका प्रसंग यावरून हनुमान चालीसाचे नियमित पठण करण्याचे महत्व पुन्हा एकदा जगाला कळले आहे. समस्त भारतीयांनी यातून बोध घेऊन आपल्या मुलांवर हनुमान चालीसाचे महत्व बिंबवून स्वतःही त्याचे नियमित पठण करावे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

## कोकच्या जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी साकारली ‘हवेत तरंगणारी बाटली’




**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०३, जिंतूर :** विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, विज्ञान विषयाची गोडी वाढावी आणि प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण मिळावे, या उद्देशाने जिंतूर तालुक्यातील कोक येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेत ‘हवेत तरंगणारी बाटली’ हा नावीन्यपूर्ण विज्ञान प्रयोग सादर करण्यात आला. इयत्ता पहिली, दुसरी आणि तिसरीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.या प्रयोगाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून समजून घेण्याची संधी मिळाली. बाटलीचा वापर करून सादर करण्यात आलेल्या प्रयोगाने विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्माण केले. विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने प्रयोगाचे निरीक्षण केले आणि विज्ञान शिकण्याचा आनंद अनुभवला.

या उपक्रमासाठी घुगे एस. डी., जडे मॅडम, गायधने मॅडम आणि सामले सर यांचे मार्गदर्शन लाभले.आजच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता प्रत्यक्ष प्रयोग, निरीक्षण आणि कृतीतून शिक्षण घेणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, तर्कशक्ती, निरीक्षणक्षमता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते. लहान वयातच विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी शाळेत राबविण्यात येणारे असे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतात.‘कृतीतून शिक्षण, प्रयोगातून ज्ञान आणि जिज्ञासेतून संशोधन!’ या संकल्पनेला साजेसा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि ज्ञानवर्धक ठरला. कोक येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेच्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिकण्याची एक वेगळी आणि रंजक संधी मिळाली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजाभाऊ सोळंके यांनी विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे शिक्षकांचे कौतुक केले.

## डेंग्यू रोखण्यासाठी ‘कोरडा दिवस’ पाळा; डॉ.कोपूरवाड यांचे आवाहन



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** प्राथमिक आरोग्य केंद्र पुळुज अंतर्गत आंबे (ता.पंढरपूर) येथे संशयित डेंग्यू रुग्ण आढळून आल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित रुग्णाच्या घरी तसेच परिसरात प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी नागरिकांना डेंग्यू प्रतिबंध व नियंत्रणाबाबत आरोग्य शिक्षण देत आवश्यक उपाययोजनांची माहिती देण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, सहसंचालक, कुष्ठरोग डॉ. मोहन शेगर तसेच सहाय्यक जिल्हा हिवताप अधिकारी किरण मंजुळ यांनी आंबे येथे भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.अधिकाऱ्यांनी संशयित रुग्णाच्या घराची तसेच आजूबाजूच्या परिसराची पाहणी केली. घरात अथवा परिसरात पाणी साचून राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. घरातील पाण्याची भांडी, टाक्या व इतर पाणी साठविणाऱ्या वस्तू झाकून ठेवाव्यात, तसेच अनावश्यक पाणी साचले असल्यास ते तातडीने वाहते करावे, असे आवाहन करण्यात आले. डेंग्यू प्रतिबंधासाठी नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस ‘कोरडा दिवस’ पाळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश कोपूरवाड यांनी सांगितले. ‘कोरड्या दिवशी’ घरातील व परिसरातील पाणी साठविणारी सर्व भांडी, टाक्या आणि इतर साहित्य तपासून त्यातील पाणी रिकामे करावे किंवा योग्य पद्धतीने झाकून ठेवावे, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, आरोग्य विभागाच्या सर्वेक्षणात आंबे येथील सुमारे ३३० लोकसंख्येच्या परिसरात हाऊस इंडेक्स ७.२ टक्के, कंटेनर इंडेक्स ९.२ टक्के आणि ब्रेटो इंडेक्स ७.२ आढळून आल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे नागरिकांनी परिसरातील पाणी साठ्यांची नियमित तपासणी करून डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. डेंग्यूबाबत नागरिकांनी अनावश्यक भीती बाळगू नये. मात्र, ताप किंवा डेंग्यूसदृश लक्षणे आढळल्यास विलंब न करता शासकीय दवाखाना अथवा संबंधित आरोग्य उपकेंद्रात जाऊन रक्त तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले. डेंग्यू प्रतिबंधासाठी आरोग्य विभाग, ग्रामपंचायत आणि स्थानिक यंत्रणांनी समन्वयाने काम करून नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करावी तसेच ‘कोरडा दिवस’ प्रभावीपणे राबवावा, अशा सूचना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दिल्या. या पाहणीदरम्यान ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### डेंग्यू रोखण्यासाठी नागरिकांनी काय करावे?

**आठवड्यातून एक दिवस ‘कोरडा दिवस’ पाळावा. घरातील पाणी साठविणारी भांडी व टाक्या झाकून ठेवाव्यात.परिसरात पाणी साचू देऊ नये. साचलेले पाणी तातडीने वाहते करावे. डासांची उत्पत्ती होणारी ठिकाणे नियमित तपासावीत. ताप आल्यास शासकीय आरोग्य केंद्रात रक्त तपासणी करून घ्यावी.**

**– डॉ. एकनाथ बोधले (जिल्हा हिवताप अधिकारी)**

## अनुदानित आश्रमशाळा जळोद येथे सर्पदंश जनजागृती मोहीम



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०३, शिरपूर (धुळे) :** आंतरराष्ट्रीय सर्पदंश जनजागृती अभियानांतर्गत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा जळोद येथे सर्पदंश जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाय यावर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. सदर सत्रास जीवरक्षा वन्यजीव संरक्षण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वाघाडी येथील सर्पमित्र तसेच संस्था अध्यक्ष दिनेश सुरेश बोरसे, त्यांच्यासोबत मुक्तार अब्बा फकीर खजिनदार, मुस्तकीन शहा सदस्य, मंगेश मिस्तरी सदस्य यांच्या समवेत कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली संस्थेचे अध्यक्ष दिनेश सुरेश बोरसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पीपीटी च्या माध्यमाने चित्रासह सापांचे प्रकार, सापांची नावे, सर्पदंश व त्यावरील प्राथमिक उपचार तसेच प्रतिबंधात्मक उपाय तसेच सर्पदंश याबाबत असलेले गैरसमज व अंधश्रद्धा याविषयी मार्गदर्शन केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील शांततेत सापांविषयी माहिती जाणून घेतली शेवटी शाळेच्या वतीने प्राथमिक मुख्याध्यापक प्रशांत मराठे यांनी संस्थाध्यक्ष व सोबत आलेल्या टीम यांचे आभार मानले कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# उद्या टाकळीढोकेश्वर येथे तुळजाभवानी पालखी यात्रोत्सव



### पालखीची गावातून निघणार भव्य मिरवणूक

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** सालाबादप्रमाणे यंदाही टाकळी ढोकेश्वर येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत व कुलदैवत असलेल्या कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेची मानाची पालखीचे हनुमान मंदीरात आज रविवारी सायंकाळी मुक्कामी आगमन होणार असून यावेळी विधिवत पूजा करून देवीच्या पालखीची स्थापना करण्यात येणार आहे.

उद्या सोमवार दिनांक ५ ऑक्टोबर रोजी दिवसभर मातेची खणा – नारळाने ओटी भरून औक्षण केले जाते. पालखीचे दर्शन आणि यात्रा भरणार आहे. तसेच उद्या सायंकाळी ५ वाजता पालखीचे स्वागत, शृंगार, पूजा, आरती होऊन भव्य मिरवणुकीला प्रारंभ होईल. त्यासाठी समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर व यात्रा उत्सव कमेटी कार्यरत झाली असून संपूर्ण गावात पालखी सोहळा उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. रात्री उशीर माळकूप व जामगाव येथे मुक्कामी तर दि.७ ऑक्टोबर रोजी रोजी सुपा येथे पालखी यात्रा भरणार आहे. व त्यानंतर पालखी नगर तालुक्यात मार्गस्थ होणार असल्याचे अंबिका (बुऱ्हाणगर) देवस्थानचे पुजारी भगत यांनी सांगितले.

शेकडो वर्षांपासून अनन्यसाधारण महत्त्व असलेली ऐतिहासिक अशी मानाची पालखीची वंशपरंपरागत भगत कुटुंब अविरतपणे मोठ्या उत्साहात जोपासत आहे.

या कालावधीत भाविकांनी पालखीच्या दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन टाकळी ढोकेश्वर गावचे सरपंच तसेच निलेश लंके प्रतिष्ठानचे बाळासाहेब खिलारी व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थ यांनी केले आहे.

**शारदीय नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने नगरहून श्री क्षेत्र तुळजापूरला जाणाऱ्या मानाच्या तुळजाभवानी देवीची पालखी गावात येणार असल्याने भावना अनेकांची मनोकामना पूर्ण होत असल्याने नवसाला पावणारी पालखी म्हणून ख्याती आहे. अशा या सोहळ्याचे आयोजन टाकळी ढोकेश्वर गावत गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे. गावात मानाची पालखी येणार असल्याने सर्व देवी भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.**

**पालखीचे दर्शनासाठी पालखीला स्पर्श करण्यासाठी शेकडो भाविक प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. ज्यांच्या नशिबी दर्शनाचे भाग्य असते, त्यांचाच हात पालखीला लागू शकतो,असे म्हटले जाते. साक्षात तुळजाभवानी सूक्ष्म रूपाने आपल्या गावात पालखी मिरवली जाणार असल्याची भाविकांची भावना आहे.**

# कुटुंबात ‘३६’ ऐवजी समजूतदारपणाचा ‘६३ चा आकडा’ ठेवावा : डॉ.विजयकुमार फड



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** कुटुंबात वावरताना सदस्यांमध्ये अनेकदा ३६ चा आकडा पाहायला मिळतो; मात्र सुखी संसारासाठी आणि कुटुंबाच्या एकोप्यासाठी ३६ चा आकडा मोडून ’६३ चा आकडा’ अंगीकारायला हवा. म्हणजेच मतभेद बाजूला ठेवून समजूतदारपणा, संवाद आणि प्रेमाने नाती जपली पाहिजेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ सनदी अधिकारी डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

येथील सामाजिक व वैचारिक जडणघडणीला हातभार लागावा, समाजातील सर्व घटकांचे प्रबोधन व्हावे आणि तरुणांना योग्य दिशा मिळावी या उद्देशाने आयोजित 'मातोश्री कै. विमलबाई वासुदेव दुसाने स्मृती व्याख्यानमाले’च्या दुसऱ्या पर्वाचे पहिले पुष्प शुक्रवारी अत्यंत उत्साहात संपन्न झाले. निफाड रोडवरील निसर्ग मंगल कार्यालयात दुसाने मित्र परिवाराच्या वतीने आयोजित या तीन दिवसीय व्याख्यानमालेत डॉ. विजयकुमार फड यांनी 'अध्यात्मातून कौटुंबिक आनंदाकडे’ या विषयावर उपस्थितांना ओघवत्या शैलीत मार्गदर्शन केले.

### मनावरील ओझे उतरवण्यासाठी अध्यात्म आवश्यक

व्याख्यानाची सुरुवात करताना डॉ. फड म्हणाले की, अध्यात्म ही कोणतीही कठीण गोष्ट नसून मानवी जीवनाची एक सहजस्थिती आहे. धावपळीच्या युगात डोक्यावरचे ओझे सहज उतरवता येते, मात्र मनावरचे अदृश्य ओझे उतरवण्यासाठी केवळ अध्यात्माचीच खरी गरज असते. संत साहित्यातील 'तुझा आहे तुझपाशी’ या उक्तीचा दाखला देत त्यांनी मानवी आनंद भौतिक वस्तूंमध्ये नसून स्वतःच्या अंतर्मनातच दडलेला असल्याचे स्पष्ट केले.

### आयुष्य दिंडीसारखे आनंदाने जगा

वारकरी परंपरेचा संदर्भ देत ते म्हणाले की, दिंडीतील वारकऱ्यांप्रमाणे मानवाने संपूर्ण आयुष्यालाच एक दिंडी मानून प्रत्येक दिवस समाधानाने आणि आनंदाने जगले पाहिजे. गोवर्धन पर्वताचा प्रसंग सांगताना त्यांनी, इतरांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हीच आनंदी जीवनाची खरी गुरुकिल्ली असल्याचे नमूद केले. शेवटी 'स्वतः आनंदाने जगा आणि इतरांनाही आनंदी ठेवा’ या जीवनमूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या व्याख्यानाला ग्रामस्थ, महिला व युवकांची मोठी उपस्थिती लाभली होती. व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी दुसाने मित्र परिवार व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

## श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती व दलितमित्र कै.पंढरीनाथज पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, बुलडाणा :** दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी श्री शिवाजी विद्यालय, तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय बुलढाणा येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी, माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती व दलितमित्र समाज भूषण कै. पंढरीनाथजी पाटील साहेब यांच्या ४८ व्या पुण्यस्मरण निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब भोंडे आजीवन सभासद, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, प्रमुख उपस्थिती प्राचार्य प्रमोद कावरे, पर्यवेक्षक पी.नरवास, शिक्षक प्रतिनिधी योगेश भोंडे, काळवाघे सर, सावळे सर, ज्येष्ठ शिक्षिका हिंगे मॅडम उपस्थित होते.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी, माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, दलित मित्र समाजभूषण कै.पंढरीनाथजी पाटील साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करण्यात आले. यानंतर नितीन ढोमणे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्याविषयी सखोल माहिती सांगितली. ज्येष्ठ शिक्षिका हिंगे मॅडम यांनी दलितमित्र कै.पंढरीनाथजी पाटील यांनी अनंत अडचणीवर मात करून बहुजनासाठी शिक्षणाची दारे खुली करून दिली. ज्या काळात बहुजन समाजाला शिक्षणाची सोय नव्हती त्या काळात त्यांनी किन्होळा देऊळगाव मही, मेरा, चांडोळ, यासारख्या ग्रामीण व दुर्गम भागात अनेक शाळा सुरू केल्या असे सांगितले, यानंतर कु.दिपाली मते यांनी लालबहादूर शास्त्री यांचे जीवन साधेपणा आणि प्रामाणिकपणाचे उत्तम उदाहरण होते.

तसेच १९६५ च्या भारत पाकिस्तान युद्धामध्ये लालबहादूर शास्त्री यांनी आपल्या खंबीर नेतृत्वाने देशाला दिशा दाखवली तसेच सैनिकाचा आणि अन्नदाता असलेल्या शेतकऱ्याचा सन्मान करण्यासाठी जय जवान जय किसान हा ऐतिहासिक नारा दिला असे सांगितले. यानंतर अरुण साळोक यांनी आपल्या भाषणातुन महात्मा गांधी यांचे विचार प्रामुख्याने सत्य व अहिंसा आणि नैतिक मूल्य वर आधारित होते असे सांगितले.

यानंतर अध्यक्षीय भाषणात ॲड. बाबासाहेब भोंडे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विचाराची आज समाजाला खरी गरज आहे, तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या जय जवान जय किसान या ऐतिहासिक नाऱ्याचे महत्त्व सांगितले. तसेच दलितमित्र समाजभूषण कै.पंढरीनाथजी पाटील साहेब यांच्या शैक्षणिक कार्याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. नितीन ढोमणे यांनी केले. कार्यक्रमाचे छायाचित्रण वाघ सर, परिहार सर यांनी केले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## अंगणवाडीच्या सेवेला सलाम! ‘आंगण का मिलन’मधून सेविका, मदतनीस व मातांचा सन्मान

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२३, कुंडलवाडी :** अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या कार्याचा गौरव तसेच माता व बालकांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने कुंडलवाडी येथे ‘आंगण का मिलन’ उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत गर्भवती महिला व स्तनदा मातांचा सन्मान करण्यात आला. अंगणवाडीतील चिमुकल्या बालकांना फळे व खाऊचे वाटप करून त्यांच्या आनंदात सहभागी होण्यात आले.

कार्यक्रमास भाजपा महिला मोर्चाच्या नांदेड जिल्हाध्यक्षा सौ. अनिता ताई चोंडीकर व नांदेड जिल्हा दक्षिण भाजपा सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवार यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा इंजि. प्रेरणाताई गजानन कोटलावार होत्या. प्रमुख उपस्थितीत उपनगराध्यक्षा नेहाताई शैलेश ऱ्याकावार व जिल्हाध्यक्ष डॉक्टर सेल डॉ. हानमंतराव लखमपुरे उपस्थित होते.

यावेळी अनिता ताई चोंडीकर यांनी अंगणवाडी सेविका व मदतनीस या बालकांच्या पोषण, आरोग्य आणि सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगितले. शासनाच्या विविध योजना तळागाळातील माता व बालकांपर्यंत पोहोचविण्यात अंगणवाडी यंत्रणेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. सेविका व मदतनीसांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे हा त्यांना प्रोत्साहन देणारा उपक्रम असून, ‘आंगण का मिलन’सारखे उपक्रम समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करतात, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार यांनी अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या कार्याचे कौतुक केले. कुंडलवाडी शहरातील वाढती गरज लक्षात घेऊन नवीन १६ अंगणवाड्यांचा प्रस्ताव जिल्हा महिला व बालकल्याण विभागाकडे सादर करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. बालकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात आणि अंगणवाडी व्यवस्था अधिक सक्षम व्हावी, यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास शहरातील साईनाथ उत्तरवार, रमेश ईरलावार, सोनी सब्बनवार, नमिता खुळगे, साईनाथ भोरे, महेश पुप्पलवार, तसेच पत्रकार प्रशांत दुसलवाड यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, अंगणवाडी कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन भाजपा मंडळ अध्यक्ष बंटी उर्फ नरेश ठक्करवार यांनी केले.

# दुष्काळात हार्वेस्टर ऐवजी मजुरांकरवी ऊस तोडणी करा

## चारा टंचाईचा प्रश्न गंभीर; गारभवानी शेतकरी गटाची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जनावरांच्या चारा टंचाईचा प्रश्न गंभीर होत आहे. अत्यल्प पर्जन्यमानामुळे हिरव्या चाऱ्याची उपलब्धता घटली असून पशुधनाच्या संगोपनाचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. त्यामुळे यंदा ऊसतोडणी करताना हार्वेस्टरऐवजी मजुरांकरवी पारंपरिक पद्धतीने ऊसतोडणी करण्याचे निर्देश संबंधित साखर कारखान्यांना द्यावेत, अशी मागणी गारभवानी शेतकरी गट, तिऱ्हे यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

दुष्काळामुळे शेती पिकांसोबतच पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याची उपलब्धताही कमी झाली आहे. अशा परिस्थितीत हार्वेस्टरद्वारे ऊसतोडणी केल्यास ऊसाचा पाला मोठ्या प्रमाणावर शेतात उपलब्ध होत नाही. त्याउलट मजुरांकरवी पारंपरिक पद्धतीने ऊसतोडणी केल्यास ऊसाचा पाला शेतकऱ्यांना जनावरांच्या चाऱ्यासाठी वापरता येऊ शकतो. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत ऊस तोडणीचे नियोजन करताना पशुधनाच्या चारा उपलब्धतेचा ही विचार करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुधनाला महत्त्वाचे स्थान आहे. दूध व्यवसायासह शेती आणि कुटुंबाच्या आर्थिक गरजा मोठ्या प्रमाणावर पशुधनाशी निगडित आहेत. मात्र, दुष्काळामुळे पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता कमी झाल्यास जनावरांच्या संगोपनाचा खर्च शेतकऱ्यांवर वाढणार आहे.

चारा टंचाई अधिक तीव्र झाल्यास काही शेतकऱ्यांना पशुधन विकण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे भविष्यातील संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी गटाने केली आहे.

ऊसाचा पाला हा जनावरांसाठी महत्त्वाचा चारा ठरतो. त्यामुळे यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत ऊसतोडणीचे नियोजन करताना शेतकऱ्यांना पाला उपलब्ध होईल, यासाठी मजुरांकरवी पारंपरिक ऊसतोडणीला प्राधान्य



शेतकरी वाचला पाहिजे आणि त्याबरोबरच शेतकऱ्याचे पशुधनही वाचले पाहिजे. चारा टंचाई अधिक गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन योग्य कार्यवाही करावी.

देण्याची मागणी करण्यात आली आहे.

ऊस वेळेत कारखान्यात पोहोचविण्याबरोबरच पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन ऊसतोडणीचे नियोजन करणे गरजेचे आहे, अशी भूमिका गारभवानी शेतकरी गटाने मांडली.

यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि संबंधित साखर कारखान्यांच्या प्रतिनिधींची तातडीने बैठक घेऊन चारा उपलब्धता आणि ऊसतोडणीबाबत समन्वित निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी गारभवानी शेतकरी गट, तिऱ्हे येथील लक्ष्मण जाधव, गोपाळ सुरवसे, रत्नाकर पवार, गोविंद जाधव, रमेश राऊत, बालाजी जाधव, अमोल शिंदे, ज्ञानेश्वर जाधव, उमेश गायकवाड, अजित जाधव आणि दत्तात्रय पाटील आदी शेतकरी उपस्थित होते.

## ‘ज्येष्ठ नागरिकांसाठी सायबर सुरक्षितता व डिजिटल साक्षरता’ उपक्रमातून नवी मुंबईत जागरूकता

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, नवी मुंबई :** १७ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत शासनाने सूचित केलेल्या विविध उपक्रमांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने प्रभावी अंमलबजावणी सुरू असून यामधील ‘सेवा योगदान’ या उपक्रमांतर्गत ‘ज्येष्ठ नागरिकांसाठी सायबर सुरक्षितता व डिजिटल साक्षरता’ हा अभिनव उपक्रम ज्येष्ठांच्या उत्साही गर्दीत राबविण्यात आला.




नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विष्णुदास भावे नाट्यगृहात संपन्न झालेल्या जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाच्या विशेष कार्यक्रमात ‘ज्येष्ठ नागरिकांची सायबर सुरक्षितता व डिजिटल साक्षरता’ या विषयावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी दैनंदिन जीवनातील अनेक उदाहरणे देत ज्येष्ठ नागरिकांनी हाऊसफुल्ल भरलेल्या प्रेक्षागृहात दिलखुलास संवाद साधत डिजिटल माध्यमांविषयी जनजागृती केली. त्यांच्यासमवेत अंमलदार अमोल कर्डिले उपस्थित होते.

तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यामुळे ज्येष्ठ नागरिक अनेकदा सायबर गुन्हेगारांचे सोपे लक्ष्य बनतात असे सांगत काळाची पावले ओळखून आता मुला-नातवंडाच्या मदतीने ज्येष्ठांनी स्वतःहूनच डिजिटल साक्षर होण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्याकरिता स्मार्टफोन, टॅब्लेट किंवा कॉम्प्युटर वापरण्याची सर्वसाधारण माहिती असणे तसेच सुरक्षित आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने ऑनलाईन बँकिंग, यूपीआय (UPI) आणि ई-वॉलेट (Google Pay, PhonePe) चा वापर सुरक्षितपणे कसा करावा याचीही माहिती करून घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक यांसारख्या माध्यमांवर कोणती माहिती शेअर करावी आणि कोणती टाळावी, इंटरनेटवर किंवा व्हॉट्सअ‍ॅपवर येणारे सर्वच संदेश खरे नसतात. त्यामुळे कोणत्याही अफवांवर किंवा फॉरवर्ड केलेल्या मेसेजवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्याची पडताळणी करण्याची मानसिकता ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी घडलेली अनेक उदाहरणे सांगत पटवून दिले.

यादृष्टीने सायबर सुरक्षितता बाळगण्याची आवश्यकता असून आपले बँक खाते, ईमेल आणि सोशल मीडियासाठी समजण्यास कठीण (डींॲपस) असा पासवर्ड ठेवणे आणि तो कोणासोबतही शेअर न करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

बँकेचे अधिकारी किंवा इतर कोणीही फोनवर ओटीपी (जढझ), यूपीआय पिन (णझख झखछ) किंवा एटीएम कार्डचा नंबर मागितल्यास तो कधीही देऊ नये अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली.

याशिवाय तुम्हाला लॉटरी लागली आहे किंवा तुमचे वीज बिल भरले नाही म्हणून कनेक्शन कट होईल – अशा प्रकारच्या खोट्या मेसेजमधील अज्ञात लिंक्सवर क्लिक करणे टाळावे त्याचप्रमाणे केवायसी (KYC) अपडेट करण्याच्या नावाखाली येणाऱ्या फसव्या फोन कॉल्सना बळी पडू नये हे त्यांनी आवर्जून सांगितले. बँक कधीही फोनवर वैयक्तिक माहिती मागत नाही, हे लक्षात ठेवणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

त्याचप्रमाणे मोबाईलमध्ये स्क्रीन शेअरिंग ॲप्स (Anydesk, TeamViewer) अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून डाऊनलोड करू नयेत, यामुळे मोबाईलचा ताबा सायबर गुन्हेगारांकडे जाऊ शकतो अशी धोक्याची सूचना देत घरातील तरुण सदस्यांनी ज्येष्ठ नागरिकांना तंत्रज्ञान शिकवण्यासाठी वेळ देणेही तितकेच गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. रोजच्या जीवनातील पूरक उदाहरणे सांगत वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी साधलेल्या दिलखुलास संवादामुळे सायबर सुरक्षितता या बाबीचे गांभीर्य अधिक प्रकर्षाने लक्षात आले असे अभिप्राय उपस्थित ज्येष्ठ नागरिकांकडून मिळाले.

सेवा संकल्प अभियानातील इतरही उपक्रमात ज्येष्ठ नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील व आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## सिडकोची परवानगी असतानाही नवरात्र मंडपाचे साहित्य हटविल्याचा आरोप; पनवेल महापालिकेच्या अधिकाऱ्याविरोधात तक्रार...

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०३,पनवेल (नवी मुंबई) :** कामोठे येथे गेल्या पंधरा वर्षांपासून सिडकोच्या जागेवर नवरात्र उत्सव साजरा करणाऱ्या मंडळाच्या मंडपाचे साहित्य महापालिका प्रशासनाने कोणत्या अधिकाराने हटविले, असा सवाल उपस्थित झाला आहे. संबंधित मंडळाने यंदाच्या नवरात्र उत्सवासाठी सिडकोकडे नियमानुसार परवानगी मागितली होती. सिडकोकडून मंडळाचा अर्ज मंजूर करण्यात आल्याचे तसेच त्यासाठी आकारण्यात आलेली रक्कम मंडळाने भरल्याचे मंडळाचे म्हणणे आहे. मात्र, त्यानंतरही मंडपाचे साहित्य हटविण्यात आल्याचा आरोप मंडळाने केला आहे.

मंडळाच्या म्हणण्यानुसार, गेल्या पंधरा वर्षांपासून सदर जागेवर नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. यंदाही उत्सवासाठी सिडकोकडे आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करून परवानगी घेण्यात आली. सिडकोने परवानगी मंजूर केल्यानंतर संबंधित शुल्कही मंडळाकडून भरले गेले. त्यामुळे उत्सवासाठी आवश्यक असलेली जागा वापरण्याचा अधिकृत अधिकार मंडळाकडे असल्याचा दावा मंडळाने केला आहे.

दरम्यान, पनवेल महानगरपालिका प्रशासनाचा सदर जागेच्या परवानगीशी थेट संबंध नसताना महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी नवरात्र उत्सवाच्या मंडपाचे साहित्य हटवून ते घेऊन गेल्याचा गंभीर आरोप मंडळाकडून करण्यात आला आहे. सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने यांच्या उपस्थितीत अथवा त्यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आल्याचा आरोप मंडळाने केला असून, या प्रकरणी त्यांच्याविरोधात पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर डॉ. रूपाली माने यांची कामोठे येथील प्रभाग ‘क’च्या प्रभाग अधिकारी म्हणून नोंद आहे. तसेच महापालिकेच्या उपलब्ध कागदपत्रांनुसार कामोठे परिसरातील काही भूखंडांच्या मालकीबाबत सिडको आणि महापालिका यांच्यातील प्रशासकीय बाबी स्वतंत्रपणे नमूद आहेत. त्यामुळे संबंधित जागेची नेमकी मालकी, वापराचा अधिकार आणि उत्सवासाठी देण्यात आलेली परवानगी याबाबत सिडको तसेच महापालिका प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. सिडकोकडे शुल्क भरून अधिकृत परवानगी घेतल्यानंतरही मंडपाचे साहित्य हटविण्यात आले. महापालिकेला सदर जागेवर कारवाई करण्याचा अधिकार नेमका कोणत्या आधारे देण्यात आला, याचे स्पष्टीकरण प्रशासनाने द्यावे, अशी मागणी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

या कारवाईदरम्यान मंडपाचे साहित्य नेण्यात आल्याने मंडळाचे आर्थिक नुकसान झाल्याचा ही दावा करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका, कारवाईचे आदेश कोणी दिले, कोणत्या कायदेशीर तरतुदीखाली कारवाई करण्यात आली आणि जप्त करण्यात आलेले साहित्य कुठे ठेवण्यात आले, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणावरून महापालिका आणि सिडको यांच्या अधिकारक्षेत्राचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सार्वजनिक उत्सवासाठी एका संस्थेकडून परवानगी मिळाल्यानंतर दुसऱ्या प्राधिकरणाने केलेल्या कारवाईमागील कायदेशीर आधार काय, हा मुख्य प्रश्न उपस्थित झाला आहे. मंडळाने या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल केल्याने आता पोलिस तपासात नेमकी वस्तुस्थिती काय समोर येते, याकडे कामोठेकरांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या आरोपांबाबत डॉ. रूपाली माने किंवा पनवेल महानगरपालिका प्रशासनाची अधिकृत बाजू उपलब्ध झाल्यास तीही या प्रकरणात महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे परवानगीची प्रत, शुल्क भरल्याची पावती, कारवाईचे आदेश, जप्ती पंचनामा आणि मंडळाची पोलिस तक्रार या कागदपत्रांच्या आधारेच पुढील वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते.

## थोडक्यात बातम्या

### सावनेर तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत सेंट ॲन्सच्या विद्यार्थ्यांचे यश

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०३, नागपूर :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सावनेर तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा नुकतीच नागपूर विद्यापीठ, रविनगर येथील मैदानावर पार पडली. या स्पर्धेत सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध पदके पटकावली.१४ वर्षे वयोगटात स्वरा इंगोले हिने ६०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक, तर वेदिका इंगोले हिने ६०० मीटरमध्ये रौप्य व १०० मीटरमध्ये कांस्यपदक मिळविले. १७ वर्षे वयोगटात भूपेश गोरे याने ३००० मीटर धावण्यात सुवर्णपदक पटकावले. तर ४÷१०० मीटर रिले शर्यतीत अवनी भक्ते, स्वरा इंगोले, अरीबा सय्यद आणि वेदिका इंगोले यांच्या संघाने कांस्यपदक मिळविले. या यशाबद्दल प्राचार्या सिस्टर क्लिओफस, व्यवस्थापिका सिस्टर सिरीया, सिस्टर प्रीती, क्रीडा विभाग प्रमुख खुशाल इंगोले, क्रीडा शिक्षक प्रतीक उमप, सिद्धार्थ माघाडे, सपना कोकाटे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

### कोराडी वीज केंद्र वसाहतीत पर्यावरण संवर्धनाचा संकल्प; ५०० झाडांची लागवड

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०३, नागपूर :** कोराडी औष्णिक वीज केंद्र वसाहतमधील जुन्या सुपरएक्स कॉलनी परिसरात पर्यावरण संवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि हरित आवरण वाढवणे उपक्रमांतर्गत नुकतेच ५०० झाडांची लागवड उपक्रम राबविण्यात आला. या वृक्षारोपण कार्यक्रमात वड, पिंपळ, फणस, आंबा, जांभूळ व इतर आदी स्थानिक हवामानाला योग्य अशा वृक्षांची लागवड करण्यात आली. प्रत्येक वृक्षाची नोंद ठेवून त्याच्या संगोपनाची जबाबदारी आहे. त्यामुळे केवळ वृक्षारोपण न करता त्यांची काळजी घेण्यावरही भर देण्यात येत आहे. यावेळी महानिर्मिती कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था – २) विलास मोटघरे यांनी सांगितले की, वृक्ष हे पर्यावरणाचे रक्षक आहेत. प्रदूषण कमी करणे, तापमान नियंत्रित ठेवणे, भूजल पातळी वाढविणे आणि जैवविविधता टिकविण्यात वृक्षांचा मोठा वाटा आहे. अशा उपक्रमांना कोराडी औष्णिक वीज केंद्राने वेळोवेळी प्राधान्याने पूर्ण केले आहे.या उपक्रमामुळे परिसरातील हरित आवरण वाढण्यास मदत होईल. आगामी काळातही अशा प्रकारचे वृक्षारोपण आणि पर्यावरण जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती कोराडी वीज केंद्राचे मुख्य अभियंता सुदीप राणे यांनी दिली.यावेळी याप्रसंगी कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था – २) विलास मोटघरे, मुख्य अभियंता सुदीप राणे, उपमुख्य अभियंता शैलेंद्र कासुलकर, मनोज उमप, वित्त विभाग प्रमुख सीमा महाले, सिव्हिल विभाग अधीक्षक अभियंता प्रयत्नशील ढवळे, किरण नानवटकर (प्रशासन), कार्यकारी अभियंता श्रीराम भारद्वाज, अति. कार्यकारी अभीयंता दीप्ती मेश्राम, उपकार्यकरी अभियंता कुलदीप शुक्ला, सहायक अभियंता विशाखा भट्टी उपस्थित होते.

### उपजिल्हाधिकारी जीवराज डापकर यांनी केली दुष्काळी परिस्थितीची पाहणी

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०३, पालम (परभणी) :** पालम तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपजिल्हाधिकारी जीवराज डापकर यांनी विविध भागातील पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी पावसाअभावी खरीप पिकांची झालेली अवस्था, पिकांचे नुकसान, विहिरी व बोअरवेलच्या खालावलेल्या पाणीपातळीमुळे निर्माण झालेली पाणीटंचाई याबाबत शेतकऱ्यांनी प्रशासनासमोर व्यथा मांडल्या. तालुक्यात सोयाबीन, कापूस, मूग, उडीद, तूर, हळद आदी पिकांवर पावसाच्या अनियमिततेचा मोठा परिणाम झाला आहे. काही भागांत पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली. त्यामुळे पीक नुकसानीचे तातडीने पंचनामे करून दुष्काळी सवलती, पीकविमा व शासनाच्या मदतीचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.पाहणी दरम्यान नगराध्यक्ष प्रतिनिधी झिया पठाण, वसंतराव शिरसकर, माधवराव गायकवाड, भैय्या शिरसकर, भगवान शिरसकर, तलाठी सुदीप चोरघडे यांच्यासह शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी डापकर यांनी शेतकऱ्यांकडून परिस्थितीची माहिती घेत संबंधित यंत्रणेला आवश्यक नोंदी व पाहणी करण्याच्या सूचना दिल्या.

### ‘पानसरे’त अभिजात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०३,अर्जापूर (नांदेड) :** पानसरे महाविद्यालय, अर्जापूर येथे मराठी विभागाच्या वतीने ‘अभिजात मराठी भाषा गौरव दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंधलेखन, वक्तृत्व व काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. या विविध स्पर्धांचे परीक्षण महाविद्यालयातील प्रा. साहेबराव सोनकांबळे व प्रा. शैलेश उल्लेवार यांनी केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व साहित्यिक अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळावे, तसेच मराठी भाषेविषयी विद्यार्थ्यांमध्ये अभिमान व आस्था निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा उद्देश होता.विविध स्पर्धांच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गोविंद चौधरी होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव बेलखेडे, स्टाफ सेक्रेटरी डॉ. देविदास जाधव, डॉ. शंकर मरकले, डॉ. मोहसिन खान, प्रा. योगाजी पवारे, प्रा. मारोती सोनकांबळे, प्रा. गौतम कांबळे यांच्यासह वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन मराठी विभागाचे प्रा. डॉ. नारायण शिवशेट्टे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. शैलेश उल्लेवार यांनी मानले